# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 04 October 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०४ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- राज्यात अकृषिक कर पूर्णपणे माफ–ऊसतोड कामगारांसाठी संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना लागू
- रेल्वेच्या खाजगीकरणाच्या सर्व चर्चा निराधार–रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून स्पष्ट
- आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर नेण्याची शरद पवार यांची मागणी
- छत्रपती संभाजीनगर महापालिकेकडून नवरात्रात प्रसवपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायद्याबाबत जनजागृती

आणि

- महिलांच्या टी–ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत आज भारताचा न्यूझीलंडशी सामना

****

राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ करण्यात आला आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सध्या गावातील गावठाणांमध्ये असणाऱ्या जमिनीवरील अकृषिक कर कायमस्वरुपी माफ आहे. मात्र गावठाणाबाहेर रहिवासी घरांची संख्या वाढत असल्याने तसंच शहरी भागात बहुमजली इमारती वाढत असल्याने, अशा इमारतींखालील जमिनींचा संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनीवरील अकृषिक करही रद्द करण्यात येईल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यात प्राचीन तसंच ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास दोन वर्षांचा तुरूंगवास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

****

राज्यातील सर्व ऊसतोड, वाहतूक कामगार आणि मुकादमांना झोपडी तसंच बैल जोडीकरता विमा संरक्षण देण्यासाठी संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. साखर कारखान्यांकडून ऊस गाळपावर प्रतिवर्षी प्रति मेट्रीक टन दहा रुपयांप्रमाणे मिळणाऱ्या निधीतून या विमा योजनेसाठी खर्च करण्यात येईल.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना राज्यमंत्रिमंडळाने मान्यता दिली. एकूण सहा उच्च पातळी बंधारे आणि चार कोल्हापुरी बंधारे अशा दहा बंधाऱ्यामुळे सिल्लोड तालुक्यातल्या १२ गावांमधल्या सुमारे दीड हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे. यासाठी येणाऱ्या ५३४ कोटी ९२ लाख रुपयांच्या खर्चालाही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

राज्यातील जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळांची स्थापना करणं, महसूल न्यायाधीकरणांच्या अध्यक्ष तसंच सदस्य पदांवर नियुक्तीसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवणं, खेळाडूंना आणि त्यांच्या प्रशिक्षकांच्या पारितोषिकांच्या रक्कमेत वाढ करणं, राज्यातील लहान जलविद्युत प्रकल्प तसंच सहःस्थित सौर ऊर्जा प्रकल्पांचा खाजगीकरणातून बांधा, वापरा आणि हस्तांतरण करा तत्वावर विकास करणं, कोकण तसंच पुणे विभागासाठी प्रत्येकी एक या प्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या-एसडीआरएफच्या दोन कंपन्या स्थापन करणं, राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करणं, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात पात्र शिक्षकेतर अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत दोन लाभांची आश्वासित प्रगती योजना लागू करणं, आदी निर्णयही आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले.

****

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्य मंत्रिमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचं अभिनंदन केलं आहे. तीन ऑक्टोबर हा दिवस यापुढे 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याच्या निर्णयालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

या निर्णयामुळे मराठीतल्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह, भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सुविधा, प्राचीन ग्रंथांचे अनुवाद, महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांचं बळकटीकरण, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थ्यांना भरीव मदत, या गोष्टी साध्य होणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

राज्य सरकारने मागील दोन वर्षांत घेतलेल्या निर्णयांचा समग्र आढावा घेणाऱ्या 'लोकराज्य' च्या विशेष अंकाचं आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीत प्रकाशन करण्यात आलं.

****

मराठी भाषेला आता ज्ञानाची, व्यापार उदीमाची आणि जागतिक विचारांची भाषा करण्यासाठी आपण प्रयत्न करण्याचं आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलं आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याच्या पार्श्वभूमीवर ते पत्रकारांशी बोलत होते. घटस्थापनेच्या दिवशी हा निर्णय झाल्याबद्दल त्यांनी सर्व मराठी जनांचं अभिनंदन केलं. दरम्यान, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल मनसेच्या नवी मुंबईतल्या पदाधिकाऱ्यांकडून वाशी इथल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष करण्यात आला.

****

रेल्वेच्या खाजगीकरणाच्या सर्व चर्चा निराधार असल्याचं, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केलं आहे. आज नाशिक इथं केंद्रीय रेल्वे सुरक्षा दलाच्या चाळीसाव्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या प्रवासाचं साधन म्हणून रेल्वे कडे पाहिलं जातं, या दृष्टीनेच केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षात रेल्वेमध्ये आर्थिक, संशोधन, सुरक्षा आणि मनुष्य बळाच्या माध्यमातून गुंतवणूक केल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. केंद्रीय सुरक्षा बलाने विकसित केलेल्या सज्ञान या कायदेविषयक मार्गदर्शन करणाऱ्या मोबाईल ॲपचे वैष्णव यांच्या हस्ते लोकार्पण

करण्यात आलं. दरम्यान, वैष्णव यांनी आज शिर्डी इथं भेट देऊन साईबाबांचं दर्शन घेतलं.

****

अनुसूचित जमातीच्या आरक्षणास धक्का लागू नये, यासह अन्य मागण्यांसाठी विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्यासह दोन आमदारांनी आज मंत्रालयातल्या संरक्षक जाळीवर उड्या मारल्या. त्यामुळे मंत्रालय परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये, या मागणीसंदर्भात मुख्यमंत्र्यांसोबतची भेट निष्फळ ठरल्यानंतर झिरवळ ही हे पाऊल उचललं, पोलिसांनी या सर्व लोकप्रतिनिधींना सुखरूपपणे जाळीबाहेर काढलं. त्यानंतर आपल्या मागण्यांसाठी झिरवळांसह सर्वांनी ठिय्या आंदोलन केलं.

****

महायुती आणि महाविकास आघाडीने मिळून आचारसंहिता लागण्यापूर्वी मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केली आहे. ते आज जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलत होते. आरक्षणाची मर्यादा वाढवा पण ओबीसीतून आरक्षण द्या, असं जरांगे यांनी म्हटलं आहे. दसऱ्याला बीड जिल्ह्यातल्या नारायणगड इथं सामाजिक मेळाव्याचं आयोजन केल्याची माहिती त्यांनी दिली.

****

केंद्र सरकारने आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर नेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी केली आहे. ते आज सांगली इथं पत्रकारांशी बोलत होते. ५० टक्क्यांच्या वर आरक्षण हवं असेल तर संसदेत कायदेशीर दुरूस्ती करावी लागेल, त्यासाठी सरकारने विधेयक आणल्यास आपण पाठिंबा देऊ, असं पवार यांनी सांगितल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

माजी मंत्री, भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. ते आज इंदापूर इथं माध्यमांशी बोलत होते. लवकरच ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा होईल, अशी माहिती पाटील यांनी दिली.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथं शारदीय नवरात्र महोत्सवात आज दुसऱ्या माळेला देवीची नित्योपचार पूजा करण्यात आली. येत्या सोमवारी ७ ऑक्टोबर रोजी ललिता पंचमीनिमित्त रथ अलंकार महापूजा, ८ ऑक्टोबर रोजी मुरली अलंकार महापूजा, ९ ऑक्टोबर रोजी शेषशायी अलंकार महापूजा, १० ऑक्टोबर रोजी भवानी तलवार अलंकार महापूजा आणि ११ ऑक्टोबर रोजी महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा बांधली जाणार आहे.

****

गर्भधारणापूर्व तसंच प्रसवपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीनं नवरात्रोत्सवाच्या काळात जनजागृती केली जात आहे. शहरात कर्णपुरा परिसरात भरलेल्या यात्रेत बेटी बचाओ बेटी पढाओ ही ध्वनिफीत ऐकवली जात आहे. गर्भलिंगनिदान किंवा स्त्री भ्रूण हत्येसंदर्भात माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांक, संकेतस्थळाचं बॅनर तसंच माझी मुलगी ही कविता प्रदर्शित करण्यात आली आहे.

****

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत आज भारताचा सामना न्यूझीलंडसोबत होणार आहे. दुबई इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरु होईल. सध्या या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज संघात सामना सुरु आहे. वेस्ट इंडिज संघाने दिलेल्या ११९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करतांना अफ्रिका संघाने दहा षटकात बिनबाद ६८ धावा केल्या आहेत.

****

नांदेड जिल्ह्यातल्या शाळांमध्ये पायाभूत सुविधा वाढल्या पाहिजेत, यासाठी शासन स्तरावरून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असं आश्वासन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी दिलं आहे. नांदेड इथं जिल्हा परिषदेच्या शिक्षक पुरस्कार प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. दुर्गम भागातील शाळा स्वयंपूर्ण झाल्या पाहिजेत यासाठी खासदार निधीतून ५० लाख रुपये निधीची तरतूद शिक्षण विभागात उपलब्ध करून देणार असल्याचं चव्हाण यांनी सांगितलं. यावेळी शंभर शिक्षकांना मानपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आलं.

****

महात्मा गांधींच्या अहिंसा, सत्य या तत्त्वांमध्ये जग बदलवण्याची ऊर्जा आहे. या ऊर्जेचा सकारात्मक वापर केला तर जगातील अशांतता दूर होईल, असा विश्वास इंडोनेशियाचे गांधी विचारवंत पद्मश्री अगुस इंद्रा उदयन यांनी व्यक्त केला आहे. जळगाव इथं गांधी रिसर्च फाऊंडेशन आणि जय हिंद लोकचळवळ यांच्यावतीनं आयोजित तीन दिवसीय ग्लोबल परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी हे विचार व्यक्त केले.

****

धुळे इथं आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३० फुट उंच स्मारकाचं लोकार्पण करण्यात आलं. शहरातल्या पांझरा नदी किनारी उभारलेल्या या स्मारकाचं श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं.

****

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत नांदेड इथून ज्येष्ठ नागरिकांना घेवून पहिली रेल्वे येत्या १२ ऑक्टोबरला निघणार आहे. या प्रवाशांची यादी समाज कल्याण कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात आली आहे. संबंधितांनी या यादीत आपल्या नावाची खात्री करुन घ्यावी, असं आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केलं आहे.

****